# संत नामदेव यांच्या साहित्यातील समाज प्रबोधनात्मक जाणीवा

डॉ. मयूर धनराज रवंदळे, प्लॉट नंबर 23, बाळाप्पा कॉलनी, अशोक नगर जवळ, धुळे

**प्रस्तावना**

संत नामदेव व संत कबीर हे मध्ययुगीन काळातील प्रमुख संत होते. मध्ययुगीन कालखंडात त्याकाळात मुस्लिम राजवट होती. समाजात अराजकता निर्माण झालेली होती. प्रत्येक धर्मात कर्मकांड, अंधश्रद्धा, चमत्कार, बुवाबाजी, आचारधर्म, जातिय आणि धार्मिक संघर्ष वाढत चाललेले होते. अशा या काळात समाजाला अंधश्रद्धेच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी, धर्माचा खरा अर्थ सांगण्यासाठी संत मंडळीनी निर्गुण उपासनेचे महत्त्व सांगितले. समाजात समता प्रस्थापित व्हावी म्हणून समाज प्रबोधन केले.

मध्ययुगाचा कालखंड म्हटला म्हणजे तत्कालीन समाजाची सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीने अध:पतनाकडे वाटचाल सुरु होती. चातुर्वण्य व्यवस्थेमुळे सामाजिक एकात्मता नष्ट होऊन भेदभावाची कल्पना मुळ धरु लागली होती. धर्म आणि पंथाच्या नावाखाली माणूस विभागला गेला होता. धर्माचे मुळ सार बाजूला पडून देवधर्माच्या नावावर अधर्म जोर धरु लागला होता. अंधश्रद्धा, बुवा-बाबा, मंत्र-तंत्र, चमत्कार यामुळे समाज निष्क्रिय बनत चालला होता. कर्मकांडानी तर कळसच गाठला होता. संतानी या काळात समाजाची घडी बसविण्याचे महान कार्य केले. संताच्या कार्याबद्दल डॉ. अलका गायकवाड लिहितात. "तत्कालीन समाज स्थितीची घडी नीट नसवण्याचे हे आव्हान संतानी स्वीकारले. परमार्थिक कल्याणाच्या उद्दिष्टासोबतच समाजाच्या अभ्युदयाचे व्यापक उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून त्यांनी सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक व्यवस्थेच्या विरुद्ध बंड पुकारले, अहोरात्र संघर्ष केला. हे करतांना ते जनता-जनार्दनाचे माय-बाप झाले. कधी कधी मेणाहूनही मऊ होऊन आईच्या ममतेने त्यांनी हळूवारपणे समज दिली तर कधी बापाच्या अधिकारवाणीने कानउघाडणी केली."[1]

संत नामदेवांनी पुरोहित वर्गाकडून सामान्य जनतेची केली जाणारी दिशाभूल लक्षात घेत त्यांचा दांभिकपणा उघडकीस आणला. पुरोहित वर्ग त्यांच्या तथाकथित ज्ञानाच्या गर्वात उन्मत झाला होता. पुरोहित वर्गाच्या विधिनिषेधाबद्दलच्या त्यांच्या भ्रामक कल्पना वाहून संत नामदेव म्हणतात.

"तत्त्व पुसावया गेलो वेदशास्त्री
तव भरले त्यापासी विधि निषेध
तया समाधान नुमजे कोणे काळी
अहंकार बळी झाला तेथे।।"[2]

पुरोहित वर्गाने त्यांचे पोट भरण्यासाठी नवनवीन कल्पना मांडून देव-धर्माचा बाजार मांडला जनसामाज्यांच्या भावनांशी खेळून पौसा कमविणे हाच एकमेव उद्देश ठेवला, अनेक मार्गानी त्यांनी पौसा कमविला. त्यासाठी दान, दक्षिणा, व्रत वौकल्यांचा मार्ग जनसामान्यांना दाखविला. यासंदर्भात बा.रं.

सुंठणकर म्हणतात, "कर्मठ मार्गांनी वाणी, उद्दमी, कारागीर शिल्पकार, शेतकरी व हस्त व्यावसायिक यांना पुरोहित वर्गाने जखडून टाकले होते. या सर्वांची मुक्तता होण्याकरिता पुरोहित वर्गाचे बंड मोडणे आवश्यक होते, नव्हे हिंदुस्थानच्या इतिहासाची ती एक गरज होती. ती भागविण्याकरिता नवे विचार, नवा धर्म, नवा उपासना मार्ग याचा अवलंब करणे आवश्यक होते. पुरोहित त्यांची संघटना उभी करणे जरुरी होते. हे कार्य करण्याचा मराठी संत मंडळाने प्रयत्न केला. त्यांनी भागवत धर्म नवा धर्म म्हणून मांडला आणि संघटना वारकरी संप्रदायाच्या स्वरुपाने निर्माण केली."[3]

संत नामदेवांनी त्यांच्या अभंगाच्या माध्यमातून निद्रिस्त समाजाला जागृत करण्याचे महान कार्य केलेले दिसून येते. समाजात असणारी असमानता, जातीभेद, धर्मभेद, पंथभेद, वर्णभेद, वंशभेद, अन्याय-अत्याचार, अनागोंदी कारभार या मुळे प्रस्त झालेली सामान्य जनता, बुवाबाजी आणि अंधश्रद्धा यात पोखरुन निघालेली निरक्षर, निराश्रित सामान्य जनता, अशा जनतेला संत नामदेवांनी धर्माचा आणि मानवी जीवनाचा खरा अर्थ आपल्या अभंगाच्या माध्यमातून सांगितला. संत तुकाराम यांनी सुद्धा बुवाबाजी विरुद्ध समाज प्रबोधन केलेले दिसून येते.

"ऐसे कैसे झाले भोंदू। कर्म करुनी म्हणती साधू।
अंगा लावुनिया राख। डोळे झाकुनी करीती पाप।"[4]

संत हा केवळ ईश्वरभक्त नसतो, तर तो समाजाचा खरा शिक्षकही असतो. संत समाजालाच नव्हे जर राष्ट्राला देखील घडवत असतात. संत नामदेवांनी देखील त्यांच्या अभंगाच्या माध्यमातून एकीकडे उपासना तर दुसरीकडे ज्ञानदानाचे कार्ये केलेले दिसून येते. त्यामुळे त्यांच्या अभंगातून सामाजिक संघटना व ज्ञानसाधना दोन्ही गोष्टी साध्य झाल्या. संत नामदेव म्हणतात.

"नाचू कीर्तनाचे रंगी।
ज्ञानदीप लावू जगी।।"[5]

संत नामदेव श्री विठ्ठलाचे नाम स्मरण करतांना तल्लीन होऊन जात असत. कीर्तनाच्याद्वारे ते समाजाला सरळ मार्गाने ज्ञान देत असत. अभंग, कीर्तनाच्याद्वारे त्यांनी समाजाला ज्ञानामृत पाजले.

अभंग आणि कीर्तनाच्याद्वारे समाज प्रबोधन करणे हे त्या काळात संत नामदेव व संत कबीर सारखे संत करत होते. संत नामदेवांनी त्यांच्या अभंगाच्या माध्यमाने पाखंड मतांचे खंडन केले. चुकलेल्यांना योग्य मार्ग दाखवला, सामाजिक नीतीमत्तेचे पाठ शिकवले. दुष्ट-दुर्जनाविषयी संत नामदेव आपल्या एका अभंगात म्हणतात.

"दुष्ट तो दुर्जन दुरीच धरावा। संग न करावा पापियाचा।।1।।
सर्पांचे पिलें सानें म्हणऊनि पोशिले। त्याची पान दिधले अमृताचें।।2।।
नव्हे तें निर्विष न संडी स्वभावगुण। होऊ पाहे प्राण पोसिल्याचे ।।3।।
विष्णुदास नामा सांगतसे युक्ति। विवेष हा चित्ती दृढ धरा ।।4।।"[6]

अर्थात संगतीचा परिणाम किती आणि कसा वाईट असतो हे संत नामदेवांनी या अभंगातून पटवून दिले आहे. जी माणसे मुळातच वाईट प्रवृत्तीची असतात, त्यांना तुम्ही कितीही चांगले वागवले

तरीही ते एक दिवस तुमच्यावर उलटतात. त्यासाठी संत नामदेव सापाचे उदाहरण देतात. सापाला तुम्ही कितीही दूध पाजले. तरीही तो तुम्हाला विषच देणार त्याप्रमाणे वाईट आणि दुर्जन माणसाची तुलना संत नामदेवांनी सापाशी केली आहे. सर्वसामान्य जनतेला त्यांनी अशा वाईट आणि दुर्जन व्यक्तींपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे. दुर्जनाशी संगतीचे वाईट परिणाम सांगताना संत नामदेव आपल्या एका अभंगात दुर्जनाना डुकराची उपमा देत म्हणतात.

"कोळशासी दुध मज्जोनियां धूतां। न पावे शुद्धता कोणे काळीं।।1।।
दुर्जनाशी तौसा बोधितां परमार्थ। नवजायाचे स्वार्थ जाण त्याचा।।2।।
सुकाराच्या परी नेणती भिष्टान्न। विष्टा ते भक्षण करिताती।।3।।
मोहिन्नले प्राणी सर्वत्र असतां। काय सांगू आता नवला हो।।4।।
नामा म्हणे तया न होयचि मोक्ष। येवोनि पद्नाक्ष केंवि भेटे।।5।।"[7]

अर्थात कोळश्याला कितीही दुधाने धुतले तरी तो त्याचा मुळ रंग सोडणार नाही. कारण कोळशाचा मूळ धर्म त्याचे काळेपण आहे. तो शुद्ध होऊच शकत नाही. त्याचप्रमाणे स्वार्थी आणि दुर्जन माणसांचा स्वभावगुणच स्वार्थी आणि वाईट असतो त्यामुळे तुम्ही त्यांच्याशी कितीही चांगले राहिले तरीही ते त्यांचा मुळ स्वभावगुण सोडत नाहीत, त्यांचा स्वार्थि ते कधीही सोडत नाहीत. यासाठी संत नामदेव डुकराचे उदाहरण देतांना सांगतात की, ज्याप्रमाणे डूकराला तुम्ही कितीही चांगले अन्न, पंच पक्वान्व दिले तरी ते विष्ठाच खाणार, त्यामुळे ही अशी मंडळी त्यांचा मुळ स्वभावगुण सोडत नाहीत. संत नामदेवांच्या मते अशा भ्रष्ट, स्वार्थी आणि वाईट माणसांना कधीही मोक्षप्राप्ती होऊ शकत नाही.

मध्ययुगात स्पृश्य-अस्पृश्य, भेदाभेद खूप मोठया प्रमाणात होता. ऊच-नीचतेची भावनना विद्‌यमान होती. इतकेच नव्हे तर अनेक जणांना स्वत:च्या देहाचा (वर्णाचा) देखील अभिमान होता. संत नामदेव म्हणतात.

"देह पडे तोवरी देहाचा अभिमान।
न करीं मी अज्ञान आत्महित।।1।।
मी माझे म्हणतां गेले नेणों किती।
रंक चकवर्ती असंख्यात।"[8]

संत नामदेवांच्या मते, राज असो वा रंक प्रत्येकाला एकेदिवशी देवाघरी जायचेच आहे. मग का म्हणून जातीचा, धर्माचा, वर्णाचा वा देहाचा मिथ्या अभिमान कशासाठी ? आलेला जीव हा जीवन जगून परमात्मा मध्ये विलीन होऊन जाणारा आहे. नश्वर आहे. मी, माझे येथेच राहून जाणार आहे. त्यासाठी 'स्व' चा त्याग करणे आवश्यक आहे. कारण तुमच्यातील 'स्व' ची भावना किंवा 'अंह' ची भावना तुम्हाला रसातळाला नेते. संत नामदेव म्हणतात.

"एक विद्‌यावंत जातीचा अभिमान।
ते नेले तमोगुणें रसातळा।।"[9]

माणूस कितीही बुद्धिमान आणि ज्ञानवंत असला परंतू त्याला जाती-धर्माचा मिथ्या अभिमान

असला, त्याच्यात तमोगुण असले की तो रसातळाला जातो. त्यासाठी माणसाने नेहमी मानवतेला महत्त्व दयावे.

संत नामदेवानी नारीविषयक विचारधारा देखील आपल्या अभंगातून स्पष्ट केली आहे. नारीचा स्वाभिमान, आदर आणि सत्कार केला पाहिजे अशी त्यांची भावना होती. परंतु मध्यकाळात नारीकडे बघण्याचा दृष्टीकोण पूर्णपणे बदलून गेलेला होता. नारीकडे भोग्या म्हणून पाहिले जात होते. संत नामदेवांनी अनेक प्राचीन उदाहरणे देत परनारीचा हल्यास किती वाईट असतो हे उदाहरणांसहित पटवून दिले.

"संग खोटा परनारीचा। नाश होईल या देहाचा।।1।।
रावण प्राणासी मुकला। भस्मासुर भस्म झाला।।2।।
गुरुपत्नीशी रतला। क्षयरोग त्या चंद्राला ।।3।।
इंद्रा अंगी सहस्त्र भंगे। नामा म्हणे विषयासंगे।।4।।"[10]

दशानन रावण स्वर्ण नगरी लंकेचा राजा त्यास सुद्धा परनारी माता सीतेचा हत्यास जडला. भस्मासुर देखील नारी शक्तीने भस्म झाला. चंद्राला गुरुपत्नीसोबत संबंध ठेवणे महागात पडले, त्यामुळे त्याला शाप मिळाला. इंद्रदेवाने देखील रुप पालटून परनारीचा हण्यास केला आणि गुरुंच्या शापाला सामोरे जावे लागले. त्यामुळे संत नामदेव म्हणतात की, परनारीचा संग ज्या व्यक्तींना हवाहवासा वाटतो त्यांचा विनाश निश्चित आहे. त्यामुळे परनारीचा आदर करणे कधीही चांगले अशी महत्त्वपूर्ण शिकवण त्यांनी समाजला दिलेली दिसून येते.

संत नामदेवांच्या काळात सामाजिक-धार्मिक पाखंड मोठया प्रमाणात होते. ज्यांच्या मनात कुठलाही भाव नाही अशी माणसे भक्तीत रमली होती. मूळ देवांना विसरुन झोटिंग, वेताळ-खेताळांच्या मागे समाज धावत होता. यासाठी संत नामदेव यम आणि यमदूत यांच्याद्वारे मृत्यृलोकातून अशा पाखंडी लोकांना आणण्याचा आदेश देतात.

"त्यांचे विषयावर ध्यान। परद्रव्य परस्त्री गमन
धर्माशी विन्मुखपण। ते कुळे आपुलें।।
भावेंविण भक्ति करिती। भक्तिविणें भाव दाविती।
त्यांची तुम्ही फाजिती। बहुतां प्रकारे करावी।।
मंत्रसंचारी जे लोक। देव सांडून दैवता उपासक।
झोटिंग वेताळ खेताळ देख। ते सखे बापा तुमचे।।"[11]

संत नामदेवांनी यमाने यमदुताला मृत्युलोकात कोणकोणाला घेऊन येण्यासाठी पाठविले आहे याची यादीच जणू दिली आहे. त्यात ज्यांचे लक्ष्य परद्रव्याकडे अर्थात दुसऱ्याच्या संपत्तीकडे असते, पर नारीकडे असते अशा लोकांचा वास मृत्युलोकात नसून नरकात आहे. ज्यांनी खरा धर्म सोडून बाह्याडंवर स्विकारला आहे. भावाविन भक्ति करत आहेत. भक्तिविना भाव दाखवत आहेत. तसेच खरे देवी-देवता सोडून जे झोटिंग, वेताळ व खोताळांच्या मागे लागले आहेत अशा लोकांची विनाश निश्चित आहे.

सामान्य जणांनी यापासून बोध घेत धर्माचा खरा अर्थबोध घेतला पाहिजे. खरी भक्ती केली पाहिजे संत नामदेवांच्या मते खरी भक्ती म्हणजे.

"जप तप ज्ञान विठ्ठल। तयासी नाही काळवेळ
टाळी वाजवितांचि निर्मळ। महादोष हरतील।।"[12]

अर्थात भक्तीसाठी कुठलिही काळ किंवा वेळ ठरलेली नाही. देवाची खज्या अर्थाने पुजा कुठेही, केव्हाही, कशीही करता येते. जो व्यक्ती निर्मळ मनाने देवाची पूजा करतो त्याचे सर्व दोष हरले जातात. व्रत करणे, तप करणे, तीर्थाटनास जाणे, उपवास करणे इत्यादी गोष्टी नाही केल्या तरी चालतात पण मात्र मनोभावे देवाच नाम संकीर्तन केले पाहिजे. त्यासाठी संत नामदेव म्हणतात.

"व्रत तप न लगे करणें सर्वथा। न लगे तुम्हां तीर्था जाणे तथा।।1।।
आपुलेचि ठायी असा सावधान। करा हरिकीर्तन सर्वकाळ।।2।।
न लगे तें काही वर्जावें अन्न जीवन। लावा अनुसंधान हरिचे पायी।।3।।
न लगे योग याग न लगे संग त्याग। असो द्या अनुराग हरिचे पायी।।4।।
न लगे निरंजनीं करणे वास तुम्हां। दृढ धरा प्रेमा हरिचे नामीं।।5।।
नामा म्हणे नाम दृढ धरा कठी। तेणें देईल भेटी पांडुरंग।।6।।"[13]

अर्थात पांडूरंगाच्या दर्शनासाठी, भेटीसाठी काहीही पाखंड करण्याची गरज नाही. ज्याप्रमाणे भक्त पुंडलिकाच्या भेटीला साक्षात पांडूरंग त्याच्या दारी आले होते. त्याचप्रमाणे भगवंताचे नामस्मरण मनाने करावे, चित्त भगवंताकडे असू दयावे तर साक्षात देवही तुम्हाला स्वत: दर्शन देईल. पुरोहित वर्गाने देवदर्शनासाठी वा देव प्रसन्न व्हावा म्हणून ही व्रत-वौकल्ये, उपवास, भोग-याग सांगितले आहेत. त्यांची खज्या अर्थाने गरज नाही आहे. या प्रकारे समाजप्रबोधनाचे काम संत नामदेव त्यांच्या अभंग आणि कीर्तनाच्या माध्यमातून करत असत.

संत नामदेवांनी त्यांच्या अभंगाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करतांना अनेक गोष्टीचा संदर्भ दिला आहे. मध्ययुगाचा कालखंड हा जाति-धर्माच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण कालखंड होताच परंतु सामान्य परिवारांमध्ये नातेसंबंधामध्ये ही दुरावा निर्माण होत होता. संत नामदेव याला कलियुगाचा प्रभाव म्हणतात. कारण पूर्वी माता-पित्याचा सन्मान केला जायचा, बहिणीचा आदर केला जायचा, भावां-भावांमध्ये घनिष्ठ संबंध असायचे. परंतु कलियुगात सर्व चित्र बदलले. संत नामदेव कलियुगाचा महिमा सांगताना म्हणतात.

"ऐसां कलियुगींचा आचार। क्रियाभ्रष्ट जाले नर।।1।।
मंचकावरी बौसे राणी। माता वाहतसे पाणी।।2।।
स्त्रियेसी अलंकार भूषण। माता वळितसे शेण।।3।।
स्त्रियेसी पाटावाची साडी। माता नेसे चिंध्या लुगडीं।।4।।
सासुसासज्या योग्य मान। मायबापा न घाली अन्न।।5।।
साली सासवा आवडती। बहिण भावां तोंडी माती।।6।।

स्त्रियेसी एकांत गोठी। मातेसी म्हणे रांड वेडी।।7।।
म्हणे विष्णुदास नामा। ऐसा कलियुगींचा महिमा।।8।।"[14]

संत नामदेवांनी कलियुगाचा महिमा वर्णन करतांना सद्‌यस्थितिचे यथार्थ वर्णन अभंगातून केले आहे. समाज कोणत्या दिशेने चालला आहे. नीती, संस्कार, मूल्ये यांची किती हाती झाली आहे हे त्यांनी त्या काळात त्यांच्या कीर्तनातून लोकांना सांगितले. समाजाला यथार्थाची जाणिव करुन देत सत्याचा, नीतीचा मार्ग दाखवला. आपली संस्कृती 'मातृदेवो भव, पितृ देवो भव' ची आहे हे पटवून दिले. संत नामदेवांनी भविष्यात डोकावून पाहतांना जणू चारही वर्ण एकत्र होतील आणि कोणीही कोणाचा विटाळ करणार नाही असे पाहिले होते. ते म्हणतात,

थोर वर्तमान पडेल काळु।
चहुं वर्णांचा होईल एकची मेळू।।
कोणी कोणाचा न धरिती विटाळु।
मग गोपाळु निघते जाले।।"[15]

वर्तमान परिस्थिती बघता संत नामदेवांचे अभंग प्रासंगिक वाटतात. स्पृश्य-अस्पृश्य, भेदाभेद, श्रेष्ठ-कनिष्ठ भावना यामुळे समाज विभागला गेला होता. संत नामदेवांनी समाज प्रबोधनाचे कार्य करत असतांना कोणाला काय आवडत नाही याचे अत्यंत समर्पक उदाहरण दिलेली आहे.

"पाप्या नावडे संतसंगति।
लोभिया नावडे उदारवृत्ति
व्यभिचारिणी नावडे पति
नावडे ज्योति उजियेडा।।
पारखी नावडे तया खोटयाला। स्नान नावडे तया विटाळा।
सुसंग नावडे नाठाळा। न्याय तंटयाला नावडे।।"[16]

पापी लोकांना कधीच संताची संगत आवडत नाही. तसेच लोभी आणि स्वार्थी लोकांना देखील उदारवृत्ति आवडत नाही. कारण त्यांचा लोभ आणि स्वार्थ कधीच सुटत नाही. जी स्त्री व्यभिचारी असते तिला पती आवडत नाही. ज्याप्रमाणे एखादया खोटया वस्तूला, व्यक्तीला पारखी व्यक्ती आवडत नाही, कारण खज्या-खोटयाची पारख करणारा खरा परखी असतो आणि असा पारखी माणूस खोटयाला चालत नाही. विटाळ अर्थात घाण माणसाला आंघोळ आवडत नाही त्याचप्रमाणे नाठाळ व्यक्तिला अर्थात दुर्जनाना चांगल्या लोकांची संगत आवडत नाही. त्याना कायम कुसंग आवडतो. संत नामदेवांनी या सर्वांपासून सामान्य जणांना दूर राहण्याचे अनमोल सल्ला, सदेश दिला आहे. साधारण उदाहरणे देऊन संत नामदेवांनी समाज प्रबोधनाचे कार्य केलेले दिसून येते.

**संदर्भ :**


- **बोरकर कल्पना एस**. (डॉ.), **संत साहित्यातील सामाजिक बंडखोरी** : **आकलन आणि चिकित्सा**, **विजय प्रकाशन**, 2019, **पान नं**. 22
- **नामदेव गाथा ज़्** 1336
- **सुंठणकर बा रं**, **महाराष्ट्रीय संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य**, 1994, **पान नं**, 60-61
- **धोडे राम**, **संत तुकाराम**, **संत तुकडोजी तुलनात्मक दर्शन**, **राजीव प्रकाशन**, **नागपूर**, 1983, **पान नं**. 64
- **श्री नामदेव गाथा**, **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ**, **मुंबई पुनर्मुद्रण जून** 2008, **अभंग**- 1844, **पान नं**. 713
- **तत्रैव**, **अभंग**- 1846, **पान नं**. 713
- **तत्रैव**, **अभंग**- 1857, **पानं नं**. 716
- **तत्रैव**, **अभंग**- 1856, **पानं नं**. 716
- **तत्रैव**, **अभंग**- 1862, **पानं नं**. 717
- **तत्रैव**, **अभंग**- 1914, **पानं नं**. 734
- **तत्रैव**, **अभंग**- 1986, **पानं नं**. 754
- **तत्रैव**, **अभंग**- 1779, **पानं नं**. 691
- **तत्रैव**, **अभंग**- 1780, **पानं नं**. 692
- **तत्रैव**, **अभंग**- 1781, **पानं नं**. 692
- **तत्रैव**, **अभंग**- 1788, **पानं नं**. 695